# सूचना (NOTIFICATION)

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१ परीक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांची गुणतालिका

म्हाडा सरळसेवा भरती २०२१ करीता दि.३१.०१.२०२२, दि.०१.०२.२०२२, दि.०२.०२.२०२२, दि.०३.०२.२०२२, दि.०७.०२.२०२२, दि.०८.०२.२०२२, व दि.०९.०२.२०२२ अशा एकूण ७ दिवशी १९ सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आली होती. क्लस्टर निहाय घेण्यात आलेल्या परीक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांची संवर्गनिहाय गुण तालिका म्हाडा च्या अधिकृत संकेतस्थळावर "**म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ परीक्षेस बसलेल्या सर्व उमेदवारांची गुणतालिका" (Marks Obtained by all candidates who appeared in the Examination"** या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात येत आहेत.

म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ मध्ये संवर्गनिहाय रिक्त पदांनुसार सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षण विचारात घेऊन जास्त पदसंख्या भरावयाची आहे तेथे १:२ व कमी पदसंख्या भरावयाची आहे तेथे १:३ या प्रमाणानुसार गुणवत्ता यादी बनवून त्या उमेदवारांना कागदपत्र तपासणी करीता बोलाविण्यात येईल. अशा प्रकारे गुणवत्ता यादी बनविण्यात आल्यानंतर ती यादी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवाराने अर्ज सादर करताना नमूद केलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून कागदपत्र तपासणी करीता येण्याची तारीख, वेळ व ठिकाण (म्हाडा मुख्यालयातील नेमका कक्ष) कळविण्यात येईल.

म्हाडा सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये गुणवत्ताधारक उमेदवारावर अन्याय होऊ नये व परीक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवाराविरुध्द भरती प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर किंवा भरती नंतरही कारवाई करण्यात येईल. अंतिम निवड होणा-या उमेदवारांकडून तसे शपथपत्र भरून घेण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. शपथ पत्राचा मसुदा सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

म्हाडा सरळसेवा भरती प्रक्रियेबाबत सविस्तर सूचना व माहिती म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतात. उमेदवारांनी म्हाडा संकेतस्थळास वारंवार भेट द्यावयाची आहे.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

नियुक्तीकरीता पात्र ठरणा-या उमेदवाराकडून घ्यावयाचे शपथपत्राचा प्रारूप मसुदा

शपथ पत्र (१०० रु. च्या स्टँप पेपरवर)

मी, ---------------------------------------------- (नाव) म्हाडा सरळसेवा भरती २०२१ मध्ये ---------------------------------- या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज केला. या पदाकरीता मी. दि.----------------- रोजी -------------------------------- या परीक्षा केंद्रावर परीक्षा दिली. म्हाडा सरळसेवा भरती करीता परीक्षा देताना मी स्वत: किंवा अन्य व्यक्तीच्या मार्फ़त कुठल्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब केलेला नाही. माझ्याकडून म्हाडा सरळसेवा भरती मध्ये परीक्षा देताना कोणत्याही प्रकारच्या गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास भरती प्रक्रियेच्या किंवा भरती झाल्यानंतर सेवेत असताना कोणत्याही स्तरावर सेवेचा कालावधी इ. बाबी विचारात न घेता मला सेवेतून बडतर्फ़ करण्यात येईल तसेच माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव आहे. म्हाडा सरळसेवा भरती परीक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास अशा प्रकारच्या कारवाईस माझी सहमती असेल.

(उमेदवाराची स्वाक्षरी)